दै. देशोन्नति दि. 22.02.2020

दै. देशोन्नती दि. 22.02.2020

# 41 लाखांचा बनावट सिगारेट साठा जप्त

## 'स्थागुशा'ची कारवाई; दोघांना दिली नोटीस



**नांदेड ■ प्रतिनिधी**

कोणताही परवाना नसलेला मानवी सेवनास हाणीकारक ठरणारा विदेशी बनावट सिगारेटचा ४१ लाख ४७ हजार ६०० रुपये किंमतीचा साठा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २० फेब्रुवारी रोजी रात्री जप्त केला. यामध्ये साठा बाळगणाऱ्या दोघांना नोटीस देवून सोडून दिले.

जुना मोंढा परिसरातील फ्रेंड्स दुकानाच्या गोदामाजवळ व शॉपमध्ये विदेशी बनावट सिगारेटचा साठा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरुन पोलिस अधिक्षक विजयकुमार मगर, अप्पर पोलिस अधिक्षक दत्ताराम राठोड यांच्या आदेशावरुन स्थागुशाचे पोनि द्वारकादास चिखलीकर यांच्या पथकाचे प्रमुख सपोनि रमाकांत पांचाळ, महादेव मांजरमकर, पोउपनि प्रविण राठोड, सपोनि गोविंद मुंढे, कर्मचारी सलीमबेग व इतर कर्मचाऱ्यांनी एनजीओ मुंबईचे सदस्य सुचित खंडाळे व त्यांच्या सहकार्यासोबत स्थागुशाचे पथकाने सदरील ठिकाणी धाड टाकली. यावेळी गोदाम व शॉपमध्ये नियमियाचे उल्लंघन वैधानिक चित्र नसलेला बनावट विदेशी सिगारेटचा साठा असल्या[...] आढळून आले. यामध्ये पोलिसांनी ४[...] लाख ४७ हजार ६०० रुपये किंमती[...] साठा जप्त केला. या प्रकरणी वजिरा[...] पोलिसात गुन्हा दाखल करण्यात [...] आहे.